| CNR No. MHJN070007922024 | **नियमित दिवाणी दावा नं. १२२/२०२४ मधील नि. क्र. ११ खालील आदेश**<br>हौसाबाई प्रल्हादराव भोरे वि.<br>मनकर्णाबाई भानुदास बळप व ईतर |
|---|---|

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरुध्द दि.०७/११/२०२४ रोजी झालेला विना जबाब आदेश रद्द करण्यासाठी दिलेला आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ आजारी असल्यामुळे न्यायालयात हजर राहुन लेखी जबाब दाखल करु शकले नाही. त्यामुळे लेखी जबाब नाही असा आदेश न्यायालयाने पारित केला आहे. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक लेखी जबाब दाखल करण्यास विलंब केलेला नाही. त्यामुळे नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन त्यांना लेखी जबाब देण्याची परवानगी देण्यात यावी.

२. वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्र. २ दिनांक २४/०९/२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले. पुरेशी संधी मिळूनही त्यांनी आपले लेखी म्हणणे न्यायालयात दाखल केले नाही. प्रतिवादी यांनी आजारपणाचे कारण अर्जात नमूद केले असले तरी आजारासंबंधी कोणतेही वैदयकीय प्रमाणपत्र दाखल केले नाही. प्रतिवादी यांनी अर्जात नमूद केलेले कारण अत्यंत मोघम स्वरुपाचे असून त्यांचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी अतिक्रमित जमीनीचा ताबा मिळण्यासाठी व विक्रीपत्रात दुरुस्ती करुन मिळणे करीता दाखल केलेला आहे. सदरचा दावा गुण अवगुणांवर निकाली काढण्यासाठी दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेणे महत्वाचे आहे. प्रतिवादी यांचा लेखी जबाब अभिलेखावर घेतलेस वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु तो जबाब अभिलेखावर न घेतलेस प्रतिवादी यांना आपली बाजु मांडता येणार नाही. त्यामुळे सदरचा दावा गुणदोषावर चालण्यासाठी प्रतिवादी यांनी

केलेली मागणी विचारात घेणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

**आदेश**

१. अर्ज निशाणी ११ वादी यांना र.रु.३००/– खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी वादी यांना खर्चाची रक्कम दिल्यानंतर त्यांचा लेखी जबाब व म्हणणे सदरकामी वाचण्यात येईल.

Digitally signed by GADE APARNA DAYANAND
Date: 2025.03.21 16:21:41 +0530

दिनांकः– २१/०३/२०२५.

(अपर्णा डी. गाडे )
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर ),
जाफ्राबाद.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द नि शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

स्वाक्षरित/–

दिनांक २१ /०३/२०२५

(अहमद शेख)
लघुलेखक.